## नियमित दिवाणी मुकदमा क्र. ८८/२०२५ मधील नि.क्र.२२ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज मुळ वादी यांनी त्यांचे विरुध्द प्रस्तुत दाव्यातील प्रतिदावा विनाकैफियत चालवण्यात यावा असा पारीत केलेला आदेश रद्द होउन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. मुळ वादी हे असे कथन करतात की, प्रस्तुत कामातील प्रतिदाव्याशी संबंधीत काही माहिती व कागदपत्राअभावि त्यांना वेळेत त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. ते पुढे असे कथन करतात की, त्यांनी आज रोजी त्यांची प्रतिदाव्यास कैफियत व म्हणणे दाखल केले आहे व ते म्हणणे दाखल करुन घेणेत यावे, अशी मुळ वादी यांनी विनंती केली आहे.

०३. मुळ प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे. मुळ प्रतिवादी असे कथन करतात की, प्रतिवादींनी दिनांक १६.०४.२०२५ रोजी दाव्याची कैफियत आणि प्रतिदावा त्यातील अनुषंगाने नि.क्र.२० दिलेला होता व आहे. त्यानंतर या वादींनी दिनांक २०.०९.२०२५ रोजी तब्बल पाच महिन्यांनी उशिरा अर्ज दिलेला आहे. प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांचे म्हणणे / कैफियत देण्यासाठी न्यायालयाने वेळोवेळी मुदती दिल्या होत्या. तरीही या वादींनी निष्काळजलपणा केला असून त्यांच्या या गैरहेतूसाठी वादींवर र. रु. ५,०००/– खर्च आकारणेत यावा, अशी मुळ प्रतिवादी यांनी विनंती केली आहे.

०४. प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. मुळ वादी व मुळ प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, मुळ वादी यांनी विहीत वेळेत त्यांची प्रतिदाव्याचे कामी लेखी म्हणणे / कैफियत अभिलेखावर दाखल केलेले नाही. माझ्या मते, प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास मुळ वादी यांना त्यांची लेखी कैफियत अभिलेखात दाखल करणे शक्य ठरेल. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास मुळ प्रतिवादींचे

अपरिमीत असे नुकसान होईल अशी सुतराम शक्यता दिसून येत नाही. सदय स्थितीत मुळ वादी यांना त्यांची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

**आदेश**

१. अर्ज खर्च रू.३००/- (रु. तिनशे फक्त) सह मंजूर करण्यात येतो.

२. मुळ वादी यांनी उपरोक्त नमूद खर्चाची रक्कम मुळ प्रतिवादींना दिल्यानंतर त्यांनी दाखल केलेली त्यांची प्रतिदाव्यास कैफियत/म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD

Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2025.12.19 11:05:45 +0530

दि.१६.१२.२०२५

(एस. पी. सय्यद)
२रे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर.वडूज.